ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# नाशिक शहरातील सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांमधील विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास

**Asst. Prof. Kirti Dilip Chitte[1] & Dr.Bhushan Vasantrao Kardile[2]**
[1]*K.K.Wagh College Of Education, Nashik Maharashtra, India*
[2]*Principal, K.K.Wagh College Of Education, Nashik Maharashtra, India*

**Abstract**

*सर्वसमावेशक शिक्षणात समावेशन या संकल्पनेत अपंग, शारीरिक व्यंग असलेले, कर्णबधीर, अल्पदृष्टी, मूकबधीर, गतिमंद, मतिमंद, संथ अध्ययक, स्वमग्न, अंध (Visually Impaired) व मानसिकदृष्टया आव्हानात्मक मुले, आर्थिक किंवा सामाजिकदृष्टया वंचित, तसेच कोणत्याही जातीजमातीची मुले व मुली अशा सर्व बालकांचा समावेश होतो. सामान्य शाळेतच अशी बालके 'स्व' विकास करू शकतात असे लक्षात आल्यानंतर शासनाने अशा बालकांना सामान्य बालकांबरोबर शिकण्याचा पूर्ण अधिकार देण्यात का येऊ नये? या हेतूने सर्वसमावेशक शिक्षणाची संकल्पना, योजना तयार करून या सर्वांना नेहमीच्या सामान्य शिक्षण व्यवस्थेत सामावून घेण्यास महत्व दिले. सर्वसमावेशक शिक्षणाचा मुख्य उद्देश हा सर्वसमावेशक विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे तसेच त्यांच्यामध्ये सामाजिक व शैक्षणिक संपादणूक वाढविणे हा आहे. आपण त्याज्य आहोत, आपण वेगळे आहोत, न्यूनत्व अशी भावना बालकांच्या मनात निर्माण होऊ नये तसेच कोणताही न्यूनगंड त्यांच्या मनात निर्माण होणार नाही त्यांच्यात स्वःत्वाचा स्थिर भाव शिक्षणातून निर्माण होण्यासाठी व हे सर्व पार पाडण्यासाठी सामान्य शाळांना विशेष भौतिक, मानवी तसेच आर्थिक सुविधा देखील उपलब्ध करून द्यायच्या आहेत. तेव्हा अशा शाळांना अनेक समस्या व आव्हानांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्या व आव्हानांवर उपाययोजना केल्यास सर्वसमावेशक शिक्षण यशस्वी होण्यास मदत होईल यासाठी सदर लघु संशोधनाद्वारे या सर्व गोष्टींचा उहापोह करण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे.*

CC BY ***Scholarly Research Journal's** is licensed Based on a work at **www.srjis.com***

## प्रस्तावना

आपल्या भारतीय समाजाचे विविधता हे जसे एक वैशिष्टय आहे तसेच शालेय वर्गातही विविधता असते. फक्त विविधतेचे स्वरूप बदललेले असते. वर्गातील बालके विविध प्रकारचे असतात. संपादणूक पातळी, बुध्दिमत्ता, भाषिक ज्ञान, सामाजिक आंतरक्रियांचे कौशल्य, कारक विकास, व्यक्तिमत्व वैशिष्टये इ. सर्वाबाबतच खूप व्यक्तीभेद बालकात असतात. जे भेद तीव्र स्वरूपाचे नसतात असे भेद असणारे विद्यार्थी सहजतेने सामान्य वर्गात सामावून जातात. एकमेकांशी जुळवून घेऊ शकतात, समायोजन साधू शकतात. मात्र हे भेद तीव्र असतील व त्यामुळे अध्ययनात अडथळे निर्माण होत असतील तर मात्र सामान्य शालेय वातावणात यांना सहजासहजी जुळवून घेता येणे कठीण जाते. म्हणूनच अशा बालकांकरीता ५० वर्षापूर्वी (उदा. अंध शाळा)विशेष शाळा

सुरू झाल्या. मात्र त्याच्यामुळे सामाजिक स्तरावर बरेचसे स्तर निर्माण झाले आणि समतेचे तत्व गुंडाळले गेले. असे लक्षात आल्यानंतर त्या धोरणात बदल होत गेले दर्जेदार शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मुलभूत हक्क आहे. प्रत्येक व्यक्तीत थोडे फार न्यून हे असतेच. पण त्याच जोडीला एखादे उल्लेखनीय असे गुणघटक किंवा कौशल्यही असतात आणि मग प्रत्येक व्यक्तीला किमान आवश्यक असे ज्ञान मिळवून स्वतःचा जीवनस्तर उंचावण्याचा जो हक्क आहे त्याची जपवणूक फक्त सर्वसमावेशक अशा शिक्षणातूनच होऊ शकेल असा विचार दृढ झाला. मानसशास्त्राचा पहिला संकल्पक जे.बी.वॉटसन आहे त्याने असा दावा केला होता, की **'Give me any child and I will make what you like'**. असे जागतिक पातळीवर मान्य झाल्यावर सर्वांना सामावून घेणारे शिक्षण हवे हे ठरले आणि सर्वसमावेशक शिक्षणाबद्दल जागरूकतेने विचार सुरू झाला त्यामधून **All are under in one roof, All are under in one umbrella** हे तत्व खऱ्या अर्थाने मान्य होऊ शकेल.

विविध प्रकारची भिन्नता असणाऱ्या बालकांकडे भेदभावाच्या दृष्टिकोनातून पाहण्याच्या वृत्तीशी लढा द्यायचा असेल तर त्यांना नियमित शाळांमध्ये सर्वसमावेशक शिक्षण देणे हा योग्य उपाय आहे. त्यातून सर्वांसाठी शिक्षण प्रत्यक्षात येऊन सर्वांचा स्वीकार करणारा, सर्वमावेशक समाज निर्माण होण्यास मदत होईल त्यामुळे सामाजिक समता व सामाजिक न्याय ही भारतीय राज्यघटनेला अपेक्षित असलेली महान मूल्ये साकार होऊ शकतील कारण समाजाची प्रतिकृती किंवा समाजाचे लघुरूप म्हणजे शाळेचा वर्ग होय. हा वर्ग विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू विकासासाठी अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावतो.

### १.२ संशोधनाची गरज व महत्व

प्रस्तुत संशोधन करण्याअगोदर संशोधकांसमोर एक स्वतः अनुभवलेले उदाहरण डोळयापुढे होते. एक पूर्णतः वाचा नसलेला व पूर्णपणे श्रवणदोष असलेला हा विद्यार्थी गतवर्षीच १० वीमध्ये

चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला. आणि आज तो एका चांगल्या नावाजलेल्या विशेष शाळेत नोकरी करून घरापासून कुटूंबातील सर्वांना सोडून दूर राहतोय. तरीही संघर्षांना न घाबरता तो आज एक दर्जेदार आयुष्य जगतो आहे. याचे कारण फक्त सर्वसमावेशक शिक्षण आहे. कारण सुरूवातीला तो विशेष शाळेत शिकत होता. मात्र नंतर सर्वसमावेशक योजनेअंतर्गत तो सामान्य शाळेत शिकू लागला. याप्रेरणेतूनच गरजेतूनच संशोधकांनी शाळांमध्ये सर्वसमावेशक शिक्षणांतर्गत

येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करावयाचे ठरविले. सर्वसमावेशक शिक्षणात अक्षम बालकांना अलग केले जात नाही. आपल्यात गुणवत्ता आहे व समाजात आपल्याला स्थान आहे अशी भावना त्यांच्यात निर्माण केली जाते. तसेच अक्षम बालकांत संवेदनक्षमता निर्माण होऊन एकसंघ समाजाची रचना होण्यास मदत होते. यासर्व गोष्टी विशेष शिक्षणातून शक्य होत नाहीत. त्यासाठी

सर्वसमावेशक शिक्षणाचे महत्व हे लक्षात घेतले पाहिजे. यापूर्वी Multipurpose School, Comprehensive School असे वेगवेगळे प्रयोग झाले आहेत. उदा. एखादा अंध मनुष्य चांगला वादक होऊ शकतो याचे जीवंत उदा म्हणजे मन्ना डेचे काका हे आंधळे होते आणि उत्कृष्ट संगीतकार म्हणून गाजले, तसेच संगीतकार रविंद्र सुध्दा आहेत.

**१.३ समस्येचे शीर्षक**

'नाशिक शहरातील सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांमधील विशेष गरजा असणाऱ्या

विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास'

**१.४ उद्दिष्टे**

१. नाशिक शहरातील सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांचा शोध घेणे.
२. नाशिक शहरातील सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळेमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.
३. नाशिक शहरातील सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळेमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
४. नाशिक शहरातील सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळेमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनात येणाऱ्या अडचणींवर सुयोग्य उपाययोजना व सूचना करणे.

**१.५ गृहितके**

१.समाजामध्ये शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी किमान १०% असा विद्यार्थी वर्ग हा विशेष गरजा असलेला विद्यार्थी गट असतो.

२.विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक किंवा दोन्ही प्रकारची दुर्बलता असते.
३.विशेष शाळांची योजना केल्यास सामाजिक स्तरामध्ये फरक पडून काही विद्यार्थी हीन दर्जाचे म्हणून गणले जातात.

४.सर्वसमावेशक शिक्षण सर्वांना किमान आवश्यक शिक्षण (Minimum essential Learning) देऊन प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी असलेले वैशिष्ट्ये किंवा कला कौशल्य विकसित करून त्यांना समर्थपणे जीवन जगण्यासाठी तयार करता येऊ शकते.

**१.५ नमूना**

नाशिक शहरातील सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या मराठी माध्यमांच्या पाच शाळा सहेतूक नमूना निवड पध्दतीने निवडण्यात आल्या.

**१.६ व्याप्ती व मर्यादा**

**व्याप्ती**

हा विषय अतिशय व्यापक आहे त्याचे स्वरूप केवळ स्थानिक नसून जिल्हा, राज्य, राष्ट्र एवढेच नव्हे तर जागतिक स्तरावरचे आहे आणि अनेक देशात, अनेक राज्यांमध्ये, त्या दृष्टिने उपाय योजनाही चालू आहे. पण अजुनही विशेष गरजा असणाऱ्या सर्व शालेय विद्यार्थ्यांचे प्रश्न अजुनही सुटलेले नाही ज्याप्रमाणे गुणी विद्यार्थीही समाजाची भविष्यकालीन संपत्ती व गौरवाचा विषय असतो. त्याचप्रमाणे शारीरिक व मानसिक दौर्बल्य असलेला विद्यार्थी हा समाजाच्या जवाबदारीचा व चिंतेचा विषय असतो. जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाला जगण्याचा हक्क बहाल केलेला असतो. ते जगण सुकर व्हावे यासाठी बालवयामध्ये समाजाने शाळेची व शिक्षणाची तरतुद केलेली असते. परिणामी समाजातील १०% असलेला हा वर्ग दुर्लक्षून चालणार नाही. कारण त्यांच्याकडे दूर्लक्ष केले तर ही बालके एकतर न्यूनगंडाने पछाडली जातात किंवा बंडखोरी करून समाजात आपले उपद्रव मूल्ये निर्माण करतात म्हणून अशा विद्यार्थ्यांचे शिक्षण हा शिक्षणतज्ज्ञांच्या, शिक्षणतत्वज्ञांच्या व शैक्षणिक मानसशास्त्रज्ञांचा चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे.

**मर्यादा**

संशोधकांना उपलब्ध असलेला वेळ आणि शाळाकडून मिळणारे सहकार्य हे मर्यादित आहे. तसेच व्यवसाय संभाळून संशोधनासाठी सारखे फिरत राहणे शक्य नव्हते. त्यामुळे व्यवसायाचे क्षेत्र असलेल्या नाशिक शहरामध्येच संशोधन करण्याचा निर्णय घेतला. नाशिक शहरामध्ये साधारणपणे मराठी, इंग्रजी, उर्दू, हिंदी, गुजराती इ.माध्यमांच्या अनेक शाळा आहे. त्यांच्या पर्यंत पोहोचणेसुध्दा मर्यादित वेळेत शक्य नव्हते आणि प्रश्नावल्या उत्तरे भरून देण्याचे सहकार्य मर्यादितच होते म्हणून फक्त मराठी माध्यमाच्या आणि शासनमान्य व जेथे सर्वसमावेशक शिक्षणाचा उपक्रम चालू आहे. अशा पाच शाळा सहेतूक नमूना निवड पध्दतीने निवडून त्यावरून निरीक्षणे व निष्कर्ष मांडण्यात आले. १०% नमूना हा तसा लहान आहे हे मान्य असले तरीही स्थानिक स्तरावर आलेली निरीक्षणे व निष्कर्ष सर्वसामान्य नियम बनवू शकणार नाही हे देखील मान्य. पणं हे एक प्रकारचे कृती संशोधन आहे त्यामुळे किमान नाशिक शहरामध्ये सर्वसमावेशक शिक्षण घेणाऱ्या शाळांतील विशेष गरजांच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देतांना येणाऱ्या अडचणींचा अंदाज येऊ शकतो व त्यासाठी योग्य सुधारणा काय करता येतील? यांसंबंधी शाळांना व संस्थांना सूचना तर शिक्षणखात्याला व शासनाला शिफारशी करता येऊ शकतात त्याचदृष्टीने हया संशोधनाची उपयुक्तता मूल्य आहे.

**१.७ संशोधन पध्दती**

अ. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी वर्णनात्मक विश्लेषण पध्दती, यातील सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग केला आहे.

ब. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी आधारसामग्री संकलित करण्यासाठी प्रश्नावली तंत्राचा वापर केला आहे.

क. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी संकलित आधारसामग्रीच्या विश्लेषणासाठी संख्यात्मक व गुणात्मक पध्दतीचा वापर केलेला आहे.

**१.८ निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनात आलेल्या निरीक्षणांवरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष दिसून येतात.

१.सर्वसमावेशक योजनेअंतर्गत शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जातात.

२.बहुतांश शाळांमध्ये सर्वसमावेशक योजनेअंतर्गत शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अपंग, शारीरिक व्यंग असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास प्राधान्य दिले जाते. नंतर कर्णबधिर, अल्पदृष्टी यांना प्राधान्य दिले जाते. व शेवटी मूकबधीर आर्थिक व सामाजिकदृष्टया वंचित व कोणत्याही जातीजमातीची मुले व मुली यांना प्राधान्य दिले जाते.

३.सर्वसमावेशक योजनेअंतर्गत बहुतांश शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन-अध्यापनासाठी शिक्षकांनी सुयोग्य प्रशिक्षण घेतलेले नाही. असे सर्व शाळांमध्ये आढळून येते.

४.बहुतांश शाळांमध्ये सर्वसमावेशक शिक्षणाच्या योजनेअंतर्गत विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापनासाठी शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षणासाठी अनेक प्रशासकीय व शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागते.

५.बहुतांश शाळांमध्ये सर्वसमावेशक शिक्षणाच्या योजनेअंतर्गत विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापनासाठी विशेष शिक्षकांची गरज भासते (अल्पदृष्टी/अंध) अस्थिव्यंग विद्यार्थ्यांच्या बाबतीत वेळेवर शिथिल धोरण वापरणे गरजेचे असते. कारण

यामुलांचे कारक कौशल्यही विकसित नसतात. मात्र विशेष शिक्षकांच्या उपलब्धतेच्या बाबतीत

नाशिक महानगरपालिका यांचे मार्फत मोबाईल शिक्षक उपलब्ध आहेत असे मत अल्प शाळांनी मांडलेले आहे.

६.शाळेमध्ये सर्वसमावेशक शिक्षण देतांना काही विशेष भौतिक सोयी सुविधा उपलब्ध केल्या

आहेत असे ९०% शाळांमध्ये आढळून येते. आणि हया सुविधा वेगवेगळे फंड निर्माण करून तयार केलेले असल्याचे दिसून येते. तर १०% शाळांमध्ये अशा सुविधा उपलब्ध नाहीत. आणि अशा सुविधा उपलब्ध करण्यास आर्थिक अडचणी भासतात हीच एक मोठी अडचण असल्याचे दिसून येते.

७.सर्वसमावेशक शिक्षणाच्या योजनेअंतर्गत शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापनासाठी शैक्षणिक व प्रशासकीय समस्या येतात. असे बहुतांश शाळांमध्ये आढळून येते. यासारख्या आव्हांनावर उपाययोजना म्हणून शाळा अध्यापन तासिका, वेळेची मर्यादा, वैयक्तिक लक्ष देणे. तसेच तासिका आधारीत प्रशिक्षित शिक्षक नेमणे हाच एक महत्वपूर्ण उपाय ठरतो असे दिसून येते.

८.बहुतांश शाळांमध्ये सर्वसमावेशक शिक्षणांतर्गत असणाऱ्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये अनेक प्रकरच्या समस्या निर्माण होतात. जसे की, यामध्ये सर्वसामान्य मूले अशा दिव्यांग मूलांना स्विकारत नाही तसेच अंध मूलांना संगणकावर, एल.सी.डी. वर आधारीत केलेले अध्यापन लक्षात येत नाही तर कर्णबधिर मूलांना ऐकू येत नसल्याने ते प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाही त्यामुळे त्यांना कितपत समजले हे देखील सांगता येत नाही.

९.सर्वच शाळांमध्ये सर्वसमावेशक शिक्षण देतांना सर्व विद्यार्थ्यांसाठी समान मूल्यमापन पध्दती राबवितांना अडचणी येतात आणि अशा अडचणींकरीता दिव्यांग विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करण्यासाठी प्रश्नपत्रिकांमध्ये थोडा फेरबदल केला जाणे, परीक्षेसाठी वेळेची मर्यादा वाढविली जाणे. अशा उपाययोजना शालेयस्तरावर केल्या जातात असे दिसून येते.

१०.बहुतांश शाळांमध्ये विशेष गरजा असणारे विद्यार्थी हे इतर सामान्य विद्यार्थ्यांशी सामाजिक समायोजन साधतांना अनेक अडचणी येतात. यामध्ये सर्वसामान्य मूले अशा दिव्यांग मूलांना स्विकारत नाहीत, त्यांना कमी लेखणे, चिडवणे, हिणवणे यासारख्या कृतीतून दिव्यांग मूलांचा आत्मविश्वास कमी होतो त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंडाची भावना निर्माण होते. तसेच यासाठी विद्यार्थ्यांना शालेय वर्गात, शालेय वेळेत अध्ययनासाठी परीवर्तनीय तंत्रज्ञानाचा वापर करणे, अध्ययन-अध्यापन जागा लवचिक ठेवणे, अभ्यासमित्र व मार्गदर्शकाची नेमणूक करणे. यासारख्या उपाययोजना केल्या जातात असे दिसून येते.

११.सर्वसमावेशक शिक्षण योजनेत अल्प शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविले जातात असे दिसून येते. या उपक्रमांमध्ये विविध समाजसेवा करणाऱ्या संस्थाचे सहाय्य घेणे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, यासारख्या उपक्रमांची अमंलबाजावणी केले जाते.

१२.सर्वसमावेशक शिक्षणाची योजना राबवितांना शासनाने प्रत्यक्ष जीवनातील परीस्थितीत लागू होणाऱ्या अध्ययानाच्या विविध क्षेत्रांना स्पर्शणाऱ्या उपाययोजना करणे, विश्लेषण, मूल्यमापन, निर्मिती, उच्च दर्जांच्या विचार कौशल्यांवर भर देणे, शिक्षकांना सुयोग्य प्रशिक्षण देणे, सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, अनुदान देणे, पालकांना समूपदेशन, मार्गदर्शन व प्रशिक्षण देणे, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे, स्वच्छतागृहाची उभारणी करून देणे, शिकणाऱ्याशी संबंधित संदर्भाची उणीव टाकून बहुश्रूत अध्ययन पध्दतीचा उपयोग करणे. अशा सूचना शाळांनी शासनाला, समाजाला केलेल्या असल्याचे दिसून येते.

**१.९ उपाययोजना व शिफारशी**

सर्वसमावेशक शिक्षण योजने अंतर्गत बहुतांश शाळा या योजनेच्या निर्णयाचा स्वीकार करीतअसल्या तरी शासनाकडून मिळणारी मदत त्यासाठी तोकडी पडते असे म्हणतात. त्यामुळे या योजनेच्या यशस्वीतेसाठी शासनाने पुढील उपाययाजनेचा सूचनांचा व शिफारशींचा विचार करावा असे प्रकर्षाने दिसून येते

१. सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापनासाठी शिक्षकांना सुयोग्य प्रशिक्षण देणे.
२. सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी भौतिक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे.
३. सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुलभ अध्ययन-अध्यापानासाठी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.
४. सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यासाठी सुलभ सोयीसुविधांसाठी स्वच्छतागृहांची उभारणी करून देणे.
५. सर्वसमावेशक शिक्षण देणाऱ्या शाळांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या यशस्वी अध्ययन-अध्यापान प्रक्रियेच्या मूल्यमापनामध्ये गरजेनूसार लवचिकता आणणे यासाठी धोरणे शिथिल करणे.